# भारतातील धर्मनिरपेक्षतेचा विपर्यास

मानवाच्या जीवनावर धर्माचा प्रभाव जबरदस्त असतो. त्यामुळे मतलबी लोक स्वतःच्या स्वार्थाकरिता धर्माचा मोठ्या कुशलतेने उपयोग करतात आणि सामाजिक स्वास्थ्य धोक्यात आणतात. धर्मनिरपेक्षता हे राज्यशास्त्रातील तत्व धर्माचे समाजातील योग्य स्थान दाखवते. धार्मिक, सामाजिक आणि राजकीय ही धर्मनिरपेक्षतेची तीन प्रमुख अंगे आहेत. सर्वधर्म समभाव हे धार्मिक अंग आहे. समाजातील कुठल्याही धर्माचा छळ होता कामा नये. धर्माच्या नावाखाली सामाजिक प्रगतीला अडथळे आणता काम नयेत. हे सामाजिक अंग आहे. जेव्हा जेव्हा समाजाच्या गरजा आणि धर्माच्या गरजा यात संघर्ष उत्पन्न होतो तेव्हा तेव्हा समाजाच्या गरजांना नेहमीच प्राधान्य दिले पाहिजे. केवळ त्याच्या धर्मामुळे कुठल्याही नागरिकाला सर्वोच्च राजकीय, लष्करी, न्यायालयीन आणि शासकीय पदापासून वंचित न करणे हे धर्मनिरपेक्षतेचे राजकीय अंग आहे.

जगाला माहित असलेले सर्व धर्म जेथे जगत आहेत असे हिंदुस्थान हे एकमेव राष्ट्र आहे. ह्या राष्ट्राची धार्मिक सहिष्णुता पुरातन काळापासून वादातीत आहे. सुप्रसिध्द फ्रेंच तत्ववेत्ता रोमेन रॉलँड लिहितो 'जर पृथ्वीच्या पाठीवर कुठल्याही भूमीवर मानवाच्या सर्व विचारांना आणि स्वप्नांना प्राचीन काळापासून आजपर्यंत सदोदित आधार दिला आहे तर ती भूमी फक्त हिंदुस्थानची आहे' थोडक्यात भारताची धार्मिक सहिष्णुता १९५० च्या घटनेबरोबर सुरू होत नाही. ती फार प्राचीन आणि पुरातन काळापासून चालत आलेली आहे. त्याकरिता भारताने जबरदस्त किंमत दिलेली आहे. आणि देत आहे.

**ब्रिटिशांची कुटिल खेळी**

'फोडा, लाचार वर्ग तयार करा. आणि राज्य करा' हे वसाहतवादाचे प्रमुख तंत्र आहे. हे तंत्र ब्रिटिशांनी हिंदुस्थानात मोठ्या कुशलतेने वापरले. भारतातील ब्रिटिश साम्राज्य अबाधित राखण्यासाठी ब्रिटिशांनी बहुसंख्याक आणि अल्पसंख्याक असे गट निर्माण केले. या गटांची विभागणी धर्मावर आधारित होती. ब्रिटिशांनी अल्पसंख्यांकाना आर्थिक आणि राजकीय सवलती उदारपणे दिल्या. ह्या कुटिल खेळीचा परिणाम १९४७ मध्ये देशाच्या फाळणीत झाला.

देशी आणि विदेशी विद्वान सांगतात की भारताने धर्मनिरपेक्षतेचे तत्व पाश्चिमात्य देशांकडून घेतले आहे. आणि भारताची धर्मनिरपेक्षता पाश्चिमात्य राष्ट्रांची हुबेहूब नक्कल आहे. हे विधान बौध्दिक लाचारीचे उत्तम उदाहरण आहे. वास्तविकता सांगते की पाश्चिमात्य राष्ट्रांची धर्मनिरपेक्षता एकदम आकुंचित आणि संकुचित आहे. कारण पाश्चिमात्य राष्ट्रात फक्त एकच धर्म आहे. तो म्हणजे ख्रिश्चनीटी. खरे म्हणजे युरोपियन देश, इंग्लंड आणि अमेरिका हे एकधर्मीय देश आहेत आणि एक धर्मीय देश हे मूलभूत धार्मिक (Theocratic) असतात.

**ही कसली धर्मनिरपेक्षता?**

धर्मनिरपेक्षतेची अत्यंत निर्मळ उदाहरणे म्हणून हेच विद्वान इंग्लंड आणि अमेरिकेकडे बोट दाखवितात आणि दुसऱ्या देशांनी त्यांचे अनुकरण करण्याचा उपदेश करतात. इंग्लंड आणि अमेरिका खरोखरच धर्मनिरपेक्ष आहेत काय? इंग्लंडमध्ये राजा किंवा राणी देशाचीच नसून धर्माचीही सर्वोच्च आणि सर्वश्रेष्ठ अधिकारी आहे. ब्रिटिश पार्लमेंटचे आणि अमेरिकन कॉंग्रेसचे कामकाज धर्मगुरूंनी फक्त प्रोटेस्टंटच्याच देवाचे आशीर्वाद मागितल्यावरच सुरू करण्यात येते. इंग्लंडचा 'लोकशाहीची आई' म्हणून गौरव होतो. पण इंग्लंडमध्ये पूर्वीपासून आजपर्यंत एकही रोमन कॅथॉलिक पंतप्रधान किंवा ब्रिटिश लष्कराचा सरसेनानी झाला नाही. अमेरिकेच्या इतिहासात आजपर्यंत एकच रोमन कॅथॉलिक अध्यक्ष म्हणून निवडला गेला आणि त्याची ताबडतोब हत्या झाली. इंग्लंड आणि अमेरिकेमध्ये अत्यंत महत्वाची राजकीय, लष्करी आणि मुलकी पदे फक्त प्रोटेस्टंटनाच मिळतात कारण ह्या देशात प्रोटेस्टंटीझम हा बहुसंख्यांकांचा धर्म आहे.

ह्याच्या उलट भारतीय प्रजासत्ताकांत धार्मिक अल्पसंख्यांकातल्या लोकांना अत्यंत महत्वाची आणि सर्वोच्च राजकीय, लष्करी, न्यायालयीन आणि शासकीय पदे दिलेली आहेत, आणि देत आहेत. आणि हे सर्व जेथे हिंदू ८५% मुस्लिम फक्त १०% ख्रिश्चन केवळ २% आणि बाकीचे ३% असलेल्या देशात होत आहे. इतकी धर्मनिरपेक्षता हिंदुस्थानाशिवाय आजच्या जगात दुसरीकडे कुठेही दिसते काय?

**अल्पसंख्यांकाकडून दुरुपयोग**

पण भारताच्या दुर्दैवाने ह्या सच्च्या धर्मनिरपेक्षतेचा धार्मिक अल्पसंख्याक दुरुपयोग करत आहेत. स्वराज्यातल्या राज्यकर्त्यांच्या धार्मिक अल्पसंख्यांकाचे फाजील लाड करण्याच्या धोरणामुळे भारतातील धर्मनिरपेक्षतेचा पूर्ण विपर्यास झालेला आहे. आसाम, काश्मीर, पंजाब, मिझोराम आणि नागालँड ह्या विपर्यासाची कटू फळे आहेत.

घटनेची २५ ते २८ कलमे भारतीय नागरिकांना धार्मिक हक्क देतात आणि २९ ते ३० कलमे धार्मिक अल्पसंख्यांकांना सांस्कृतिक आणि शैक्षणिक हक्क देतात. २५ वे कलम नागरिकांना धर्माचा 'प्रचार' करण्याचा हक्क देते. धार्मिक अल्पसंख्यांक प्रचाराचा हक्क म्हणजे धर्मांतराचा हक्क असा अर्थ करतात. धर्मांतर हे सदैव स्वखुशीने किंवा सक्तीने होत असते. जेव्हा कुठल्याही माणसाला त्याच्या स्वधर्माचे दोष आणि तो स्वीकारणाऱ्या नव्या धर्माचे गुण पूर्णपणे आणि तंतोतंत माहित असतात तेच धर्मांतर स्वखुशीचे असते. पण आज जगात एकही धर्म असा नाही की ज्याच्यामध्ये दोष नाहीत. उदा. हिंदू धर्म मूर्तिपूजक आहे म्हणून त्याचा उपहास केला जातो. पण Christianity आणि इस्लाममध्ये मूर्तिपूजाही आहे आणि विभूतिपूजाही आहे. सर्वधर्मसमभाव ह्याचा खरा अर्थ सर्व धर्म सारखेच दोषी आहेत. एकही धर्म निर्दोष नाही किंवा सर्वोत्कृष्ट नाही. ह्यामुळे कुठलेही आणि कोणतेही धर्मांतर हे सदैव सक्तीचेच धर्मांतर असते. म्हणूनच महात्मा गांधी म्हणत की 'जर माझ्या हातात सत्ता आली तर मी पहिल्यांदा भारतातील सर्व तऱ्हेच्या धर्मांतरावर ताबडतोब बंदी घालेन' घटनेच्या ह्या कलमांचा Christian missionaries पण गैरफायदा घेत आहेत. ज्या देशाचे राज्यकर्ते आणि 'सामाजिक समते'साठी झटत आणि झिजत आहेत असे सांगतात, जो देश दरवर्षी कोट्यवधी रुपये राज्यकर्त्यांच्या आणि त्यांच्या खुषमस्कऱ्यांच्या चैनी आणि विलासी जीवनावर उधळीत आहे तो देश दुर्बलांच्या उध्दाराकरता परराष्ट्रीय मिशनऱ्यांवर अवलंबून राहतो. ह्याच्या इतकी बेशरम, लज्जास्पद आणि लांच्छनास्पद दुसरी गोष्ट नाही. ही गोष्ट स्वराज्यात गेली चाळीस वर्षे चालत आलेली आहे.

**समान कायदा हवा**

राज्यकर्त्यांनी ताबडतोब भारतामध्ये समान मुलकी कायद्याची संहिता आचरणात आणावी असा आदेश घटनेने १९५० मध्ये दिला होता पण धार्मिक अल्पसंख्यांकाच्या दडपणामुळे राज्यकर्त्यांनी ते आजपर्यंत केले नाही. जर एक पत्नित्व आणि घटस्फोट ह्या बदलत्या काळाच्या गरजा आहेत तर त्यांचा फायदा मुसलमानांना आणि कॅथोलिकांना का मिळू नये? जर संततिनियमनाशिवाय राष्ट्राची आर्थिक स्थिती सुधारणार नाही तर कॅथोलिकांच्या धर्मगुरूंच्या संतति नियमन विरोधी फतव्यांचा बडेजाव कशाला?

भारतात निकोप धर्मनिरपेक्षता आणि खरी लोकशाही जोपासण्यासाठी पुढील पावले उचलली पाहिजेत.

१) ज्या राष्ट्रात बहुसंख्याक आणि अल्पसंख्याक हे फक्त धर्मावर विभागले जातात ते राष्ट्र कधीही धर्मनिरपेक्ष नसते व त्या देशात खरीखुरी लोकशाहीही नसते. सर्वप्रथम ही लबाडी भारतात ब्रिटिशांनी केली आणि तीच लबाडी स्वराज्यात चाळीस वर्षे चाललेली आहे. नागरिकांची ही धार्मिक विभागणी ताबडतोब बंद झाली पाहिजे. भारत सरकारने नेमलेल्या असंख्य कमिशनांपैकी 'मायनॉरिटीज कमीशन' हे अत्यंत हास्यास्पद कमिशन आहे. त्याचे जनक १९७९ मधले जनता सरकार आहे. मायनॉरिटीज कमिशन मायनॉरिटी complex ला खतपाणी घालत आहे. म्हणूनच ते ताबडतोब बरखास्त केले पाहिजे.

२) घटनेच्या २५ व्या कलमातून 'प्रचार' हा शब्द काढून टाकला पाहिजे. तसेच २५ ते २८ कलमांची शाब्दिक पुनर्रचना केली पाहिजे. नाहीतर भारतातील धर्मनिरपेक्षतेचे विडंबन आणि विटंबना कधीही थांबणार नाही. भारतातील सर्व विदेशी मिशनरी संस्था ताबडतोब बंद केल्या पाहिजेत. charity begins at home. भारत सरकारने मिशनरी लोकांना स्पष्टपणे सांगितले पाहिजे की प्रत्येकाने स्वतःच्या देशातील दुर्बलांचा आणि दलितांचा उध्दार करण्यात आपले बहुमूल्य आयुष्य खर्ची घालावे. धर्मांतरावर ताबडतोब बंदी घातली पाहिजे.

३) २९ आणि ३० कलमे घटनेतून काढून टाकली पाहिजेत. ह्या कलमांनी धार्मिक बहुसंख्यांकातील आणि धार्मिक अल्पसंख्यांकातील गरीबांचे फायद्यापेक्षा नुकसानच जास्त केलेले आहे. धर्मनिरपेक्षतेच्या नावाखाली देशातील बहुसंख्य गरीब जास्त गरीब होत आहेत आणि अल्पसंख्यांक श्रीमंत जास्त श्रीमंत होत आहेत. ह्या अल्पसंख्यांक श्रीमंतात सर्व धर्माचे धूर्त आणि कावेबाज लोक आहेत. आजच्या भारतात मतलबी आणि स्वार्थी राज्यकर्त्यांच्या हातात धर्म हे 'भांडवल' झालेले आहे आणि धर्मनिरपेक्षता हा एक 'फायदेशीर धंदा' झालेला आहे. ह्या धंद्यात असलेले लोकच सर्व तऱ्हेचे मंत्री, राज्यपाल, राजदूत, न्यायाधीश सर्व तऱ्हेच्या कॉर्पोरेशनचे अध्यक्ष आणि सदस्य आणि विद्यापीठांचे उपकुलगुरू होतात. ह्याच लोकांची मुले आणि सगेसोयरे राष्ट्रातील महत्वाची पदे आणि मोठ्या पगाराच्या जागा बळकावतात. भारतातील आजची लोकशाही ही एक तमाशा आहे. जेथे गरिबी असते तेथे खरी लोकशाही कधीच नसते हे कटू सत्य आहे. गरिबीचे समूळ आणि संपूर्ण उच्चाटन झाल्याशिवाय कुठल्याही देशात खरी लोकशाही नांदत नसते हे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट आहे.

४) राष्ट्रामध्ये सर्व धर्माच्या नागरिकांकरिता एकच मुलकी कायद्याची संहिता ताबडतोब अंमला आणली पाहिजे.

५) धार्मिक अल्पसंख्यांकांनी चालविलेल्या शैक्षणिक संस्था ह्या राष्ट्रविरोधी चळवळीच्या शाळा बनल्या आहेत. निष्कपट मुलांना राष्ट्रगीत न म्हणण्यासाठी आणि राष्ट्रध्वजाचा आदर न राखण्यासंबंधी चिथावणी देण्यात येते. ह्या शाळांवर सरकारने कडक व करडी नजर ठेवली पाहिजे. ह्या शाळांना सरकारी परिपत्रकांतून आदेश दिला पाहिजे की राष्ट्रगीत, राष्ट्रध्वज, राष्ट्रभाषा आणि राष्ट्रीय सणांचे यथोचित आदर व गौरव करण्याचे शिक्षण प्रत्येक विद्यार्थ्यास दिले पाहिजे आणि राष्ट्रचिन्हांचा अपमान आणि उपहास करणाऱ्या नागरिकांस कठोर शिक्षा दिली पाहिजे.

**डॉ. मारुती अवदी**